Peer Reviewed and
UGC Listed Journal No. 47026

ISO 9001 : 2015 QMS
ISBN / ISSN

ISSN 2319 - 359X

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
HALF YEARLY RESEARCH JOURNAL



IDEAL

Single Blind Review /
Double Blind Review

Volume - XIII | Issue - II
March - August 2025
MARATHI PART - I

Impact Factor / Indexing
2023 - 7.537
(www.sjifactor.com)

Ajanta Prakashan

CONTENTS OF MARATHI PART - I

अनु क्र.	लेख आणि लेखकाचे नाव	पृष्ठ क्र.
१३	भारतातील शैक्षणिक बदलाचा ऐतिहासिक आढावा **प्रा. भाऊराव रामेश्वर तनपुरे**	५७-६२
१४	राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०चा ग्रामीण शिक्षणावर परिणाम **श्री उद्धव शिवाजी जमधाडे**	६३-६८
१५	राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० राजकीय विकासाच्या दृष्टिकोनातून विश्लेषण **डॉ. वासुदेव वामन भगत**	६९-७२
१६	नवीन शैक्षणिक धोरणात मराठीच्या कौशल्यधिष्ठित अभ्यासक्रमाचे महत्त्व **प्रा. कु. अलोलिका अजाबराव पारधी**	७२-७४
१७	राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० एक विश्लेषणात्मक अभ्यास **डॉ. गजानन बनचरे**	७५-८०
१८	राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० मधील आव्हाने आणि संधींचा विश्लेषणात्मक अभ्यास **डॉ. गजानन संतोषराव कुबडे**	८१-८४
१९	नवीन शैक्षणिक धोरणाचा ग्रामीण विद्यार्थ्यांवर परिणाम **डॉ. निलम मधुसूदन छंगाणी**	८५-९०
२०	राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० **प्रा. डॉ. पंडित शिमराम मोरे-लांडगे**	९१-९६
२१	नवीन शैक्षणिक धोरण: मराठी भाषा संधी **डॉ. विष्णू नामदेव लांडे**	९७-१०१
२२	नवीन शैक्षणिक धोरण-२०२०चा भारतीय अर्थव्यवस्थेवर प्रभाव **डॉ. वैशाली भिवसेन भिसे**	१०२-१०६
२३	नवीन शैक्षणिक धोरण २०२०-उच्च शिक्षणातील स्थित्यंतरे **डॉ. सुनिता प्रल्हाद मनवर**	१०७-११०
२४	नवीन शैक्षणिक धोरण २०२०: गुरुकुल शिक्षण पद्धती **डॉ. साहेबराव सुकाराम पवार**	१११-११४
२५	राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०- आव्हाने व उपाययोजना **प्रा. प्रमोद तुकाराम अढाव**	११५-११८

२१. नवीन शैक्षणिक धोरण: मराठी भाषा संधी

डॉ. विष्णू नामदेव लांडे
मराठी विभाग प्रमुख, मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाशिम, जि. वाशिम.

राष्ट्रीय शिक्षण धोरण- 2020 हे शैक्षणिक धोरण जेष्ठ वैज्ञानिक डी. के. कस्तुरीनंदन यांच्या अध्यक्षतेखाली तयार करण्यात आले. नवीन भारत आणि भविष्यासाठी, नवीन युवा पीढी घडविण्यासाठी हे शैक्षणिक धोरण महत्त्वाचे असल्याचे मानले जाते. अलीकडील काळात भारताने नुकतेच हे नवीन शैक्षणिक धोरण - 2020 स्वीकारले आहे. त्यानुसार सर्वच विद्यापीठात या धोरणानुसार अभ्यासक्रमाची आखणी करून, नवीन अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली जात आहे. नव्या शैक्षणिक धोरणामुळे सर्वत्र या धोरणाची चर्चा होत आहे. या धोरणामुळे जुन्या शिक्षण व्यवस्थेतील 10+2+3 या आकृतीबंधाऐवजी 5+3+3+4 हा नवा आकृतीबंध स्वीकारला गेला. या शैक्षणिक धोरणात प्रामुख्याने सर्वांना उच्च व गुणवत्तेचे शिक्षण उपलब्ध करून देणे, भारतीय असल्याचा अभिमान विद्यार्थ्यांच्या व्यवहारात, बुध्दीत व कृतीत रूजविणे, विद्यार्थ्यांच्या मुलभूत कर्तव्यांविषयी आदर निर्माण करणे, त्यांच्यात वैश्विक नागरिक निर्माण करणे यासारखे उद्देश समोर ठेऊन या धोरणाची आखणी करण्यात आली. आज ज्ञानाच्या क्षेज्ञात उच्च-नीचतेचे बरेचसे अंतर पडले आहे. कला, विज्ञान, व्यावसायिक असे शैक्षणिक प्रवाह निर्माण झाले आहेत. शिक्षण क्षेत्रात अशा प्रकारचे कोणतेही स्पष्ट विभाजन नसावे, या दृष्टीतूनही नवे धोरण उद्यास आले. आज विज्ञान आणि तंत्रज्ञानात मोठ्याप्रमाणात बदल होत आहेत. त्यामुळे जगभरातील अकुशल कामे माणसांऐवजी यंत्रे करू लागली आहेत. त्यामुळे बहुशाखीय क्षमता असलेल्या कुशल कर्मचाऱ्यांची मागणी वाढत चालली आहे. त्यामुळे शिक्षण क्षेत्रातही बदल करणे गरजेचे झाल्याने, बहुशाखीय क्षमता असलेले विद्यार्थी निर्माण करण्यावर यातून भर दिला गेला. त्यासाठी शिक्षण हे अनुभवात्मक, सर्वसमावेशक, एकात्मिक, जिज्ञासू, संशोधनकेंद्रित, लवचिक व आनंददायी करण्यावर भर दिला गेला. सर्वांसाठी समावेशक आणि समान गुणवत्तेचे शिक्षण सुनिश्चित करण्यासाठी या शैक्षणिक धोरणाची आखणी करण्यात आल्याचे मानले जाते. नव्या शिक्षण व्यवस्थेचा हेतू तार्किक विचार आणि कृती करण्यासाठी सक्षम असलेल्या आणि करूणा, सहानुभूती, धैर्य, चिकाटी, विज्ञानाधिष्ठित कल, रचनात्मक कल्पनाशक्ती, नैतिक बांधिलकी व मूल्य असलेल्या चांगल्या व्यक्ती निर्माण करणे असा आहे. या शैक्षणिक धोरणातून चांगला माणूस, विचारवंत, अष्टपैलू व्यक्तिमत्व, कल्पक व्यक्ती विकसित करण्याचे ध्येय समोर ठेवण्यात आले. या धोरणात उच्च शिक्षणामध्ये सर्वोच्च दर्जा, समानता, एकात्मता आणणाऱ्या सुधारणा अभिप्रेत आहेत. या धोरणामुळे शालेय शिक्षणाबरोबरच उच्च शिक्षण क्षेत्रात अमुलाग्र असे बदल झाले आहेत. या धोरणात मातृभाषेला विशेष महत्त्व दिल्या गेले. संभाषण आणि अध्ययन-अध्यापनासाठी जास्तीत जास्त मातृभाषेचा वापर व्हावा असे या धोरणावरून निदर्शनास येते. त्यामुळे मराठी भाषेचे अध्ययन व अध्यापन करणाऱ्यांसाठी अनेक संधी उपलब्ध

झाल्या आहेत. मराठी भाषेत नवीन शैक्षणिक धोरणामुळे कोणत्या संधी निर्माण झाल्या त्याचा परामर्श प्रस्तुत लेखातून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

मराठी भाषेमध्ये अनेक प्रकारच्या बोली आहेत. या प्रत्येक बोलींमध्ये काहीसे वेगळेपण आहे. त्यामुळे त्यांचे स्वतंत्र अस्तित्व आहे. बोलींच्या या विविधतेने मराठी भाषा समृध्द होण्यास एकप्रकारे मदत झाली आहे. अलीकडील काळात मात्र मराठींच्या या बोलीपैकी अनेक बोलींचा व्यावहारिक जीवनात फारसा वापर होताना दिसून येत नाही. त्यामुळे मराठींच्या बोलींसमोर अनेक समस्या निर्माण होत आहेत. पर्यायाने मराठींच्या काही बोली या नामशेष होण्याच्या मार्गावरही आहेत. गेल्या 50 वर्षात देशातील 220 पेक्षा जास्त बोली भाषा या मृत झाल्या असल्याचे सांगितले जाते. युनेस्कोने तर 197 भारतीय भाषा संकटग्रस्त म्हणून घोषित केल्या आहेत. याच संकटग्रस्त भाषेमध्ये मराठींच्या अनेक बोलींचाही समावेश असू शकतो. नवीन शैक्षणिक धोरणात समृध्द असलेल्या भाषेतील बोलींचे नमुने जतन करण्यावर विशेष लक्ष केंद्रित केले आहे. त्यामुळे मराठी भाषेतील नामशेष होऊ पाहणाऱ्या भाषेतील बोलीचे विविध आवाजाचे नमुने जतन केले जातील अशी अपेक्षा आहे.

मराठी भाषेतील नाटक, लोकसाहित्य, लोकसंगीत यासारखी परंपरा ही संपन्न व समृध्द अशी आहे. परंतु कालओघात हे वैभव नाहिसे होण्याचे संकट निर्माण झाले आहे. नव्या शैक्षणिक धोरणात लोकसाहित्याचा हा वारसा जतन करण्यावर विशेष भर दिला आहे. या धोरणानुसार लोकसाहित्याच्या क्षेत्रातील जेष्ठ नागरिकांकडून व्यक्त होणारे कलेचे नमुने, साहित्य व संस्कृती ही ध्वनीमुद्रित किंवा व्हिडिओच्या स्वरूपात जतन केल्या जाणार असल्याचे आश्वासित केले आहे. याकरीता विद्यापीठ हे संशोधकांमार्फत तसे प्रयत्न करणार आहे. त्यासाठी विशेष अनुदानाची सोयही उपलब्ध करून दिली जाणार असल्याचे म्हटले आहे. त्यामुळे मराठी भाषेतील समृध्द असलेल्या लोकसाहित्याचे संचित हे ही जतन केल्या जाईल. मराठीतील लोकगीते, लोककथा, म्हणी, उखाणे, वाक्प्रचार संकलित करण्यासाठी अनेक संशोधक पुढाकार घेतील. ज्यातून मराठी भाषेचे हे वैभव येणाऱ्या पीढीसाठीसुध्दा दिशादर्शक ठरेल असे वाटते.

भाषा ही कला आणि संस्कृतीशी अतूटपणे जोडल्या गेली असल्याचे मानले जाते. साहित्य, नाटक, संगीत, चित्रपट इ. कलेचा आस्वाद हा भाषेशिवाय घेतल्या जाऊ शकत नाही. त्यामुळेच एखादी संस्कृती टिकविण्यासाठी आणि तिच्या प्रसारासाठी, त्या संस्कृतीच्या भाषेचे जतन आणि तिचा प्रसार केला पाहिजे असे या धोरणात नमूद आहे. त्यामुळे या शैक्षणिक धोरणातील निर्देशानुसार कला व संस्कृतीशी जोडल्या गेलेल्या, मराठी भाषेचेही जतन आणि प्रसार करण्यास निश्चितच ठोस अशी पाऊले उचलली जातील अशी अपेक्षा आहे.

नवीन शैक्षणिक धोरणानुसार भारतीय भाषा, कला आणि संस्कृतीचा अभ्यास करण्यासाठी सर्व वयोगटातील लोकांसाठी शिष्यवृत्त्यांची स्थापना केल्या जाईल असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा, कला आणि संस्कृतीचा अभ्यास करण्यासाठी भविष्यात अनेक वयोगटातील व्यक्तींना शिष्यवृत्तीचा लाभ मिळेल असे या धोरणाच्या ध्येयधोरणानुसार निदर्शनास येते.

मराठी भाषा ही महाराष्ट्राची राजभाषा आहे. असे असले तरी या भाषेचा सर्वच क्षेत्रासाठी वापर होताना दिसून येत नाही. आजही अनेक क्षेत्रात ही भाषा नाममात्रच किंवा अपवादानेच वापरल्या जाते. न्यायालयाचे कामकाज पाहिजे त्या प्रमाणात मराठी भाषेत होताना दिसून येत नाही. आज न्यायालयासारखी, वैद्यकीय शिक्षण यासारखे अनेक क्षेत्रे आहेत, तिथे मराठी भाषेचा सार्वत्रिक वापर केल्या जात नाही. त्यामुळे मराठी भाषेचा प्रचार व प्रसार होण्यास मर्यादा येतात. मात्र नव्या शैक्षणिक धोरणात भारतीय भाषांचा प्रसार होण्यासाठी त्या त्या भाषेचा नियमितपणे वापर करण्यासाठी प्रोत्साहन दिले जाईल असे स्पष्टपणे नमूद आहे. त्यामुळे मराठी भाषेचा सार्वत्रिक क्षेत्रात वापर होईल व सर्वच शाखांतील अध्ययन व अध्यापनासाठी ज्ञानभाषा म्हणून मराठी भाषेचा वापर केल्या जाईल असे या शैक्षणिक धोरणाच्या मसुद्यावरून लक्षात येते.

मराठी भाषेतील साहित्य हे श्रेष्ठ व दर्जेदार स्वरूपाचे आहे. या भाषेतील सर्वच साहित्य प्रवाह व प्रकार समृध्द व संपन्न आहेत. मराठी भाषेतील साहित्याला प्रदीर्घ अशी परंपरा असल्याचे सिध्द झाल्यानेच, आज स्थितीत मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झालेला आहे. ही भाषा अधिकाधिक समृध्द होण्यासाठी येणाऱ्या काळातही या भाषेत सकस अशा साहित्यकृती निर्माण होणे गरजेचे आहे. नव्या शैक्षणिक धोरणातील मसुद्यात भारतीय भाषांतील काव्य, कादंबऱ्या, अकाल्पनिक पुस्तके, पाठ्यपुस्तके, पत्रकारिता, आणि इतर सकस व जोमदार साहित्याच्या निर्मितीसाठी प्रोत्साहन देणाऱ्या योजनांची निर्मिती केली जाईल असे नमूद केले आहे. त्यासोबतच असामान्य गद्य व काव्यासाठी पुरस्कारही दिले जातील असेही म्हटल्या गेले आहे. यावरून मराठी भाषेतील साहित्याच्या निर्मितीसाठीही अशा प्रोत्साहन देणाऱ्या अनेक योजनांचा लाभ मिळेल व पर्यायाने मराठीतील साहित्यकृतीसाठीही अनेक पुरस्कार मिळतील अशी अपेक्षा आहे.

नव्या शैक्षणिक धोरणातील तरतुदीनुसार उच्च गुणवत्तेचे भाषा शिक्षक निर्माण करण्यामध्येही मदत होईल. विद्यार्थ्यांमध्ये स्थानिक कला, भाषा आणि हस्तकलांना प्रोत्साहन देण्यासाठी उत्कृष्ट स्थानिक कलाकार व कारागिरांना अतिथी शिक्षक म्हणून नियुक्त केले जाणार असल्याचे निदर्शनास येते. भारतातील समृध्द विविधतेचे ज्ञान विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष पाहून आत्मसात केले पाहिजे, यासाठी विद्यार्थ्यांचे दौरे आयोजित करण्याचे या शैक्षणिक धोरणात निश्चित केले आहे. अशा दौऱ्यातून मराठीतील कला आणि साहित्य पाहण्यासाठी अनेक विद्यार्थी भेटी देतील. त्यामुळे त्या ठिकाणचे पर्यटन वाढण्यास मदत होईल अशी शक्यता वर्तविली जाते.

संविधानाच्या आठव्या अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या प्रत्येक भाषेसाठी अकादमीची स्थापना केली जाईल असे या शैक्षणिक धोरणाच्या मसुद्यात स्पष्ट नमूद आहे. संविधानाच्या आठव्या अनुसूचीमध्ये मराठी भाषेचाही समावेश आहे. त्यामुळे या नव्या धोरणानुसार मराठी भाषेसाठी स्वतंत्र अकादमीची स्थापना केली जाईल असे वाटते. त्याचबरोबर आठव्या अनुसूचीमध्ये नमूद असलेल्या भारतीय भाषेतील आधुनिक संकल्पना समजून घेण्यासाठी, त्या त्या भाषेचा शब्दकोश प्रकाशीत करण्याचे नमूद आहे. हा शब्दकोश महान विद्वान व्यक्तीं व स्थानिक भाषिक यांच्या सहकार्यातून तयार केल्या जाईल असेही नमूद आहे. त्यानुसार मराठी भाषेतील शब्दकोश प्रकाशित करण्यासाठी, मराठी भाषेतील महान विद्वान व्यक्ती व स्थानिक भाषिकांचा समावेश केल्या जाईल अशी

अपेक्षा आहे. मराठी भाषेतील शब्दसंग्रह आणि शब्दकोष हे नियमितपणे अद्ययावत केली जातील अशीही अपेक्षा आहे. शब्दसंग्रह व शब्दकोष अद्ययावत केल्याने मराठी भाषेतील वर्तमान मुद्यांवर आणि संकल्पनांवर विस्ताराने भाष्य करणे सोईस्कर होईल.

सर्व अभिजात भाषा आणि साहित्याचे अध्ययन करणाऱ्या संस्था आणि विद्यापीठांचा विस्तार केल्या जाईल. दुर्लक्षित हस्तलिखितांचे जतन, भाषांतर, अभ्यास करण्यासाठी प्रयत्न केल्या जातील असेही नव्या शैक्षणिक धोरणात नमूद आहे. त्याचाही फायदा मराठी भाषेला होईल असे प्रथमदर्शनी तरी म्हणता येईल. यावरून नव्या शैक्षणिक धोरणानुसार भारतीय भाषांतील उच्च दर्जाचे अध्ययन साहित्य, महत्वाचे लिखीत व मौखिक साहित्य हे भारतीय व परदेशी भाषांमध्ये उपलब्ध करून देण्यासाठी भाषांतर व दुभाषी कामाच्या प्रयत्नांचा विस्तार केल्या जाणार आहे. यासाठी इंडियन इन्स्टीट्यूट ऑफ ट्रान्सलेशन अँड इंटरप्रिटेशन IITI ची स्थापना केल्या जाणार आहे. ज्यामध्ये अनेक बहू भाषिक तज्ञ लोक भाषांतरकार किंवा दुभाषी म्हणून कामकाजसुध्दा करू शकतात. या IITI मार्फत मराठी भाषेचे साहित्य हे भारतातील व परदेशी विविध भाषेत भाषांतर करण्यासाठी पुढाकार घेतल्या जाणार असल्याचे शैक्षणिक धोरणाच्या मसुद्यावरून निदर्शनास येते.

या धोरणातून शालेय स्तरापासून ते उच्च शिक्षणापर्यंत अध्ययन-अध्यापनासाठी डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर व्हावा असे अपेक्षित आहे. त्यातूनच यासाठी अनेक उपक्रमांची आखणी करण्यात आली. ज्यामध्ये ऑनलाईन शिक्षणासाठी पथदर्शी अभ्यास करणे, डिजिटल पायाभूत सुविधा निर्माण करणे, ऑनलाईन अध्यापन प्लॅटफॉर्म साधने निर्माण करणे, ई-सामुग्रीचा प्रसार करण्यासाठी विश्वासार्ह बँकअप यंत्रणा निर्माण करणे, डिजीटल दरी कमी करणे, व्हर्च्युअल प्रयोगशाळा निर्माण करणे, शिक्षकांना प्रशिक्षण आणि प्रोत्साहन देणे, ऑनलाईन परीक्षा व मूल्यांकन करणे, अध्ययनाची मिश्र मॉडेल्स उपलब्ध करून देणे, यासारखे उपक्रम घेण्याचे लक्ष समोर ठेवण्यात आले आहे. यातून अनेक प्रकारची शैक्षणिक सॉफ्टवेअर उपलब्ध करून दिल्या जातील. ही सॉप्टवेअर सर्व भारतीय भाषांमध्ये असतील. त्यामुळे या सर्व सोयी-सुविधा मराठी भाषेतील विद्यार्थ्यांसाठीही उपलब्ध होण्याची शक्यता शैक्षणिक धोरणाच्या ध्येय-धोरणातून निर्माण झाली आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणासंदर्भातील मराठी भाषेचा संधीचा विचार करता, या धोरणातून मराठी भाषेसाठी मोठ्या प्रमाणात संधी निर्माण झाल्याचे दिसून येते. या शैक्षणिक धोरणामुळे मराठी भाषेतील लिखीत व मौखिक साहित्य हे जतन व सवंर्धन करण्यावर भर दिला जाणार आहे. त्यासाठी IITI मार्फत पुढाकार घेतला जाणार आहे. मराठी भाषेचा शब्दसंग्रह व शब्दकोश अद्ययावत व जतन केले जाणार आहे. मराठी भाषेतील साहित्याचा प्रचार व प्रचार होण्यासाठी हे साहित्य भाषांतरित करण्यासाठीही प्रयत्न केले जाणार आहेत. मराठीच्या नामशेष होणाऱ्या बोलींचे संवर्धन केले जाणार आहे. दूर्लक्षित हस्तलिखितांचे जतन केले जाणार आहे. उच्च गुणवत्तेचे भाषा शिक्षक निर्माण करण्यासाठी पुढाकार घेतल्या जाणार आहे. मराठी भाषेतील नाटक, लोकसाहित्य, लोकसंगीत यासारखी परंपरा जतन केली जाईल. अभिजात भाषा म्हणून साहित्याचे अध्ययन करणाऱ्या संस्था आणि विद्यापीठांचा विस्तार केल्या जाईल, मराठी भाषेत नवीन सॉफ्टवेअर, मॉडेल निर्माण होतील, यासारखे कितीतरी चांगली ध्येय-धोरणे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातून मांडली आहेत. कोणतेही शैक्षणिक धोरण हे त्याच्या अंमलबजावणीवर अवलंबून असते. या धोरणाची प्रभावी अंमलबंजावणी झाली,

तर नक्कीच शैक्षणिक क्षेत्रात काहीतरी परिवर्तन होईल अशी आशा आहे. अन्यथा प्रभावीपणे अंमलबजावणी न झाल्यास, शिक्षण व्यवस्था व मराठी भाषेला कितीतरी दुष्परिणामांनासुध्दा सामोरे जावे लागू शकते. मातृभाषेतून सार्वत्रिक शिक्षण देण्याचा विचार मांडला खरा, परंतु इंग्रजी भाषेच्या वाढत्या प्रहस्थामुळे हा विचार अडचणीचा ठरू शकतो. नव्या शैक्षणिक धोरणातील अनेक तरतुदी आर्थिक तिजोरीवर भार पाडणाऱ्या आहेत, पुरेशी आर्थिक तरतूद उपलब्ध न झाल्यास, अनेक तरतुदी प्रत्यक्षात राबविता येणे अशक्यप्राय होईल. या शैक्षणिक धोरणामुळे अनेकांचे रोजगार हिरावून घेतले जाऊ शकतात. हे धोरण प्रत्यक्षात कसे राबवायचे हे स्पष्ट नसल्याने महाविद्यालये, शिक्षक व विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम निर्माण होऊ शकतो. या धोरणात व्यावसायिक शिक्षण आणि कौशल्य विकासावर अधिक भर दिल्याने, परंपरागत मराठी साहित्यावर अन्याय होऊ शकतो. या धोरणात व्यावसायिक शिक्षण हे मातृभाषेतून देण्याचा मानस आहे, परंतु व्यावसायिक शिक्षण मातृभाषेतून देण्यात अनेक अडचणी निर्माण होऊ शकतात. अभ्यासक्रम निवडताना लवचिकता दिल्याने, अनेक पारंपरिक विषयाकडे दूर्लक्ष होऊ शकते. या धोरणामुळे महाविद्यालये व विद्यापीठे यांना स्वायत्त दर्जा देण्याची तरतूद असल्याने, भविष्यात त्यांचे खाजगीकरण होण्याचीही शक्यता वर्तविल्या जात आहे.

संदर्भ ग्रंथ

१. राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020, शिक्षण मंत्रालय, भारत सरकार
२. नवे शैक्षणिक धोरण, प्रा. नितीन करमळकर, राजहंस प्रकाशन पुणे
३. नवे शैक्षणिक धोरण 2020 :एक चिकित्सक अभ्यास, संपा. लक्ष्मीकांत देशमुख .



CONTACT FOR SUBSCRIPTION

AJANTA
ISO 9001: 2015 QMS/ISBN/ISSN
Dr. Vinay S. Hatole
Jaisingpura, Near University Gate,
Chhatrapati Sambhajinagar (Aurangabad)
Maharashtra - 431 004,
Cell : 9579260877, 9822620877
E-mail : ajanta2023@gmail.com
Website : www.ajantaprakashan.in